# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १२/१२/२०१९

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०४

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. २०/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा दि. २०/१२/२०१९ सभा सुचना क्र. ०४

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे -** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| ५६ | दि. ०९/०८/२०१९, दि. १४/०८/२०१९ (दि. ०९/०८/२०१९ रोजीची तहकुब सभा) व दि. ०९/०९/२०१९ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - |
| ५७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. |
| ५८ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे |
| ५९ | विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे. |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ६० | महिला व बालकल्याण समिती अंतर्गत निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या लग्नाकरिता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरिता आर्थिक मदत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. १९/०८/२०१९, शिफारस केलेले प्रकरण क्र. २४) |
| ६१ | महिला व बालकल्याण समिती अंतर्गत मुली व महिलांसाठी Cervical Cancer च्या उपचारासाठी आर्थिक मदत देणेबाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. १९/०८/२०१९, शिफारस केलेले प्रकरण क्र. २५) |
| ६२ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमीत्त सानुग्रह अनुदान देणेबाबत. |
| ६३ | घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण करणे व जतन करणे कामाच्या वाढीव अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे. |
| ६४ | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत नागरी आरोग्य केंद्रात कार्यरत आशा स्वयंसेविका यांच्या मानधनात वाढ करणेबाबत. |
| ६५ | अस्थायी बालवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करणेबाबत. |
| ६६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste (C & D)) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामाबाबत. |
| ६७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विकसीत करण्यात आलेल्या कम्युनिटी हॉलच्या वापरासाठी भाडे दर निश्चित करणेबाबत. |
| ६८ | भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ येथून मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे (खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे) कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| ६९ | घोडबंदर प्रवेशद्वारासमोर शिवाजी महाराज पुतळा बसविणे व चौकाचे सुशोभिकरण करणे कामाच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत. |
| ७० | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामी वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक प्रशासकीय मंजूरीबाबत. |
| ७१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयेयांचे दैनंदिन संचलन, देखभाल, दुरुस्ती करणे कामाबाबत. |

| | |
|---|---|
| ७२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमितील जळाऊ लाकडे पुरवठा कामास मंजूरी मिळणेबाबत. |
| ७३ | मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. ७२(२), ७३(१)(२)(३)(४), ७४(१)(२), ७९(१)(३)(४), ७५(१) या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे. (फेरसादर) |
| ७४ | चेना येथील ठाणेकडे जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद रस्त्यापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. ९८ पर्यंतचा १८.०० मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| ७५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता स्थापन करण्यात आलेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीबाबत. |
| ७६ | आरक्षण क्र. २१७ येथे पहिल्या मजल्यावर डायलिसिस केंद्र चालू करणेसाठी धर्मदाय संस्थेस जागा उपलब्ध करुन देणेबाबत. |
| ७७ | मा. महासभा ठराव क्र. ६०, दि. २०/०२/२०१८ व मा. महासभा ठराव क्र. २१, दि. ०७/०६/२०१९ च्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संथांच्या कर आकारणी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची प्रकरण २ मधील नियम १(र) नुसार फेर निर्णय घेणेबाबत. |
| ७८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत. |
| ७९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत दर्शविलेले मंजूर विकास योजना रस्ते सीमेंट कॉंक्रीट करुन विकसित करणेच्या मोबदल्यात विकासकास मोबदला मिळणेसाठी निर्णय होणेबाबत. |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे - |

(वासुदेव शिरवळकर)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

महा**नगरपालिका सचिव कार्यालय**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- १२ डिसेंबर, २०१९**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २० /१२/२०१९**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.४७ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी खालील निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०१९ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे :-

१) ॲड. रवि व्यास - भारतीय जनता पार्टी
२) श्री. मोहन गोपाल म्हात्रे - भारतीय जनता पार्टी
३) श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली - भारतीय जनता पार्टी
४) श्रीम. वंदना मंगेश पाटील - भारतीय जनता पार्टी
५) श्रीम. मिरादेवी रामलाल यादव - भारतीय जनता पार्टी
६) श्रीम. तारा विनायक घरत - शिवसेना
७) श्री. जुबेर इनामदार - कॉंग्रेस लोकशाही आघाडी
८) श्री. राजीव मेहरा - कॉंग्रेस लोकशाही आघाडी

निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५, शिवसेना पक्षाचा १ व कॉंग्रेस लोकशाही आघाडीचे २ सदस्य निवृत्त होत आहेत. मा. उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण२००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवि-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) अन्वये नविन आठ सदस्यांची दोन वर्षासाठी नेमणूक होणेसाठी महासभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर) 14/11/19
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/१२/२०१९

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ५८:-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे.**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करुन घेता येईल. हे सदस्य वृक्षप्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे. प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील.

ठाणे महानगरपालिकेने गठित केलेल्या वृक्ष प्राधिकरण समितीवर प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित न केल्याने मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र.११९/२०१७ नुसार ठाणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समिती बरखास्त करण्यात आलेली आहे. करिता मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र.११९/२०१७ मध्ये पारित आदेशाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समिती गठित करताना प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये सदस्यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक आहे. तथापी नियम ३(३) अन्वये नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोटकलम १ अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.

मा. महासभा दि. ५/०९/२०१९, ठराव क्र. ५७ अन्वये पालिका सदस्यामधून घ्यावयाचर सदस्य संख्या ९, बिनसरकारी संघटनाचे प्रतिनिधी २ व आयुक्त पदसिध्द अध्यक्ष अशी एकुण १२ सदस्यांची वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

महापालिका सदस्यांमधून घ्यावयाचे सदस्य संख्येसाठी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | समिती सदस्य १२ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९५ x ९ = ५.७७ | ६ | ६१ ÷ ९५ x १२ = ७. ७० | ८ |
| २ | शिवसेना | २२ ÷ ९५ x ९ = २.०८ | २ | २२ ÷ ९५ x १२ = २. ७७ | ३ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९५ x ९ = १.१३ | १ | १२ ÷ ९५ x १२ = १. ५१ | १ |

तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून घ्यावयाची सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून घ्यावयाची सदस्य संख्या निश्चीत करुन, वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 10/6/15
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/१२/२०१९

## नगरसचिव विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ५९ :-  विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 2 कलम 30(1) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. त्या अनुषंगाने मा. महासभा दि. 18/07/2018, ठराव क्र. 23 अन्वये पुढील विशेष समित्या गठित करून विशेष समित्यांची सदस्य संख्या 9 (नऊ) इतकी निश्चित केलेली आहे.

1) पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती

2) शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती

3) विधी व नियोजन समिती

4) आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती

वरील समितींवर नामनिर्देशित झालेल्या सदस्यांची मुदत संपुष्टात आलेली असुन, नवीन सदस्यांची नेमणूक होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात विशेष समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९५ x ९ = ५.७७ | ६ |
| २ | शिवसेना | २२ ÷ ९५ x ९ = २.०८ | २ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९५ x ९ = १.१३ | १ |

तरी वरीलप्रमाणे विशेष समित्यांवर सदस्य नेमणुक करणेसाठी प्रस्तावित करण्यांत आहे.

(बालाजी खतगांवकर)
११/१२/१९.
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/१२/२०१९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

प्रकरण क्र - ६०

करिता मा. महिला व बालकल्याण समिती

सभा दि :- १९/०८/२०१९

प्रकरण क्र.२४ :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "निराधार/ विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या लग्नाकरीता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक मदत"

ठराव क्र. २४

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या महिलांना महिला व बालकल्याण विभागा मार्फत मुलींच्या विवाहाकरीता व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य देण्यात येते. सदर महिलांना आर्थिक सहाय्य देणेबाबत महिला व बालकल्याण समितीच्या सभेमध्ये निर्णय होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने आजपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जास मंजुरी देत असुन सदर महिलांना मुलींच्या विवाहाकरिता व मुलांच्या शिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

निराधार/ विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलांच्या शिक्षणाकरीता खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते.

| शैक्षणिक वर्ष | वार्षिक मदत रुपये |
|---|---|
| १ ते ५ | ७०००/- |
| ६ ते ८ | १०,०००/- |
| ९ ते १२ | १२,,०००/- |
| १३ ते पदवी | १५,०००/- |

१) निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेच्या मुलामुलींना शैक्षणिक आर्थिक मदत मिळणेबाबत करावयाचा अर्जासोबत खालील अटीशर्तींचे पुर्तता करणे आवश्यक आहे.

१ महानगरपालिका क्षेत्रामधील ५ वर्षाचा रहिवासी पुरावा.
२ बोनाफाईड सर्टिफिकेट
३ शिधापत्रका किंवा आधारकार्ड
४ निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेचे वय १८ ते ५० वयाचा पुरावा.
५ अर्जासोबत वडीलांचा मृत्युदाखला व घटस्फोटीत असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६ या वर्षाची शैक्षणिक फी संबधी शैक्षणिक शुल्क मागणी पत्र/शुल्क भरणा केलेला असल्यास पावती जोडणे आवश्यक आहे.

इतर सुचना :-

१ अर्जा सोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.
२ दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेच्या मुलीच्या विवाहासाठी रु.२१,०००/- अक्षरी एकवीस हजार इतके अर्थसहाय्य देण्यात येत.

२) अर्जासोबत खालील अटीशर्तींचे पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ५ वर्षाचा रहिवासी पुरावा.
२) मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माच्या दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा
३) अर्जदार महिलेने पतीचा मृत्यु दाखला किंवा घटस्फोटीत असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.
४)मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडावी.

इतर सुचना :-

१) अर्जदाराच्या मुलीचा विवाह निश्चीत झाल्यानंतर अथवा विवाहानंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेल अर्ज ग्राहय समजण्यात येतील.

२) सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात "निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या लग्नाकरीता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक मदत" करणेकामी रु.१५.०० लाख तरतुद आहे.

वरीलप्रमाणे "निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या लग्नाकरीता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक मदत" देण्यास हि सभा मा. महासभेस शिफारस करित आहे.

सूचक Meena Kangane M. Kangane | अनुमोदन विविता नाईक V.Naik

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
महिला व बालकल्याण समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २६/०८/२०१९ वेळ ०३=९४
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ.क्र. ५२ वर्ष :- २०१९-२०

२६/०८/२०१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/१२/२०१९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

प्रकरण क्र- ६१ करिता मा. महिला व बालकल्याण समिती
सभा दि :-१९/०८/२०१९

प्रकरण क्र.२५ :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत मुली व महिलांसाठी **Cervical Cancer** च्या उपचारासाठी आर्थिक मदत देणेबाबत..

ठराव क्र.२५

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुली व महिलांसाठी Cervical Cancer या आजाराने ग्रासलेल्या रुग्णाला महिला व बालकल्याण विभागा मार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते. सदर महिलांना आर्थिक सहाय्य म्हणून किती रक्कम दयावी याबाबत महिला व बालकल्याण समितीच्या सभेमध्ये निर्णय होणे गरजेचे आहे. सदर सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने Cancer या आजाराने ग्रासलेल्या रुग्णास आर्थिक सहाय्य दिले जाईल.

सन २०१८-१९ या वर्षात सदर योजने अंतर्गत मुली व महिलांसाठी Cancer या आजाराने ग्रासलेल्या रुग्णास रु.२०,०००/- इतकी रक्कम अर्थसहाय्य देण्यात येत होती. तरी या वर्षी रु.१०,०००/- वाढीव करुन रु.३०,०००/- इतकी रक्कम देण्यात यावी जेणेकरुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्यात यावा.

सदर अर्जासोबत खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

- हॉस्पीटलचे कॅन्सरचे सर्टिफिकेट
- अर्जा सोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.
- रेशनकार्ड/आधारकार्ड
- मिरा भाईंदर क्षेत्रातील रहिवाशी असावा.
- दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकामध्ये "Cervical Cancer" पिडीत रुग्णास आर्थिक मदत या लेखाशिर्षाखाली रु. ३.०० लाख तरतुद आहे.

सदर योजने अंतर्गत मुली व महिलांसाठी Cancer या आजाराने ग्रासलेल्या रुग्णास रु.३०,०००/- इतकी रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्यास हि सभा मा.महासभेस शिफारस करित आहे.

सूचक

अनुमोदन

Veena
वीणा भोईर

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
महिला व बालकल्याण समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

Hetal Parmar

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 20/12/2019

## || गोषवारा ||

प्रकरण क्र. :- 62 महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापुर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अन्वेय मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.31/10/2002 रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.31/10/2002 रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित आहे. गेल्यावर्षी मा.महासभा दि.19/10/2018, ठराव क्र.76 अन्वये महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील अधिकारी/कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेला आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2018-19 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1516 | 21000/- | 30651250/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 69 | 16170/- | 1115730/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 05 | 9240/- | 80850/- |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व | 121 | 8663/- | 10,48,223/- |

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2018-19 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| | क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | | |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 125 | 3300/- | 4,12,500/- |
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 9240/- | 36,960/- |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 15 | 13282/- | 1,99,230/- |
| 8. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | 28 | 13282/- | 3,71,896/- |
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 9240/- | 27,720/- |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7980/- | 39,900/- |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 37 | 13282/- | 4,91,434/- |
| 12. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9240/- | 18,480/- |
| 13. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5775/- | 34,650/- |
| | एकुण | 1937 | | 3,45,28,823/- |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2018-19 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 183 | 18480/- | 33,24,860/- |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 20 | 16170/- | 3,18,010/- |
| | एकुण | 203 | | 36,42,870/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान एकूण रु. **3,45,28,823/-** तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु.**36,42,870/-** इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर दि.31/03/2019 पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन-2018 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2018-19 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1476 | 21,000/- | 3,09,96,000/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 67 | 16170/- | 10,83,390/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 29 | 9240/- | 2,67,960/- |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व आय.एन.टी.सी.पी. कर्मचारी, आर.बी.एस.के./आहारतज्ञ पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 128 | 8663/- | 11,08,864/- |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 115 | 3300/- | 3,79,500/- |
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचार (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 9240/- | 46,200/- |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 41 | 13282 | 5,44,562/- |
| 8. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | | | |
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 9240/- | 27,720/- |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7980/- | 39,900/- |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 40 | 13282/- | 5,31,280/- |
| 12. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9240/- | 18,480/- |
| 13. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5775/- | 34,650/- |
| 14. | दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 05 | 5775/- | 28,875/- |
| 15. | सेवा निवृत्त लेखापरिक्षण अधिकारी | 4 | 21,000/- | 84,000/- |
| | एकुण | 1926 | | 3,51,91,381/- |

शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2017-18 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 178 | 18,480/- | 32,89,440/- |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 23 | 16,170/- | 3,71,910/- |
| | एकुण | 201 | | 36,61,350/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु. **3,51,91,381/-** (अक्षरी- तीन कोटी एकावन्न लाख ऐक्याण्णव हजार तीनशे ऐक्याऐंशी मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.3.50 कोटी इतकी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु.**36,61,350/-** (अक्षरी - छत्तीस लाख एकसष्ट हजार तीनशे पन्नास रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.40 लक्ष इतकी तरतुद आहे.

तरी मागील वर्षी प्रमाणे मा. महासभा मंजुरीनुसार या वर्षी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना व शिक्षक वर्गास सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे शिफारस आहे.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

प्राप्त दि. १७/०९/१९ ११.४० वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा नोंद
रजिस्टर अ. क्र. ५७ वर्ष २०१९/२०

नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/१२/2019**

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ६३ )** :- घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण करणे व जनत करणे कामाच्या वाढीव अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर येथे किल्ला असून सदर किल्ला पुरातत्व व वस्तु संग्रहालये, महाराष्ट्र राज्य यांनी करारनाम्याव्दारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेला आहे. सद्यस्थितीत प्रथम टप्प्यात महानगरपालिकेमार्फत घोडबंदर किल्ला दुरुस्ती व जतन कामासाठी रु.1,81,67,930/- एवढ्या रक्कमेच्या कामास मा.महासभा दि.19/05/2017 ठराव क्र.09 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली असून सदर कामाचे कंत्राटदार यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर घोडबंदर किल्ला सुशोभिकरण व जतन दुरुस्ती कामासाठी पुरातत्व विभागाने सुचविल्यानुसार व मान्यता दिल्यानुसार एकुण रु.5,47,05,553/- चे काम करवे लागणार आहे. सदर कामास संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालये, महाराष्ट्र राज्य यांनी दि.18/07/2019 रोजीच्या पत्रान्वये मंजुरी दिलेली आहे. घोडबंदर किल्ला सुशोभिकरण व जतन दुरुस्ती कामासाठी एकुण रु.5,47,05,553/- एवढा खर्च होणार असून निविदा मागविलेले काम वगळता उर्वरित रु.3,65,37,623/- एवढ्या रक्कमेचे काम करणे गरजेचे आहे. सदर कामासाठी सन 2019-20 या लेखाशिर्षकात पुरेशी तरतुद उपलब्ध आहे. तरी घोडबंदर किल्ला सुशोभिकरण व जतन करण्यासाठी रु.3,65,37,623/- एवढ्या रक्कमेच्या वाढीव अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यास शिफारस आहे.

14/8/19

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-09/VP/2019-20/YJ/MG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा सभा दि.२० /१२ / २०१८

### ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( ६४ ) : राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत नागरी आरोग्य केंद्रात कार्यरत आशा स्वयंसेविका यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची १० आरोग्य केंद्र कार्यान्वित आहेत. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान प्रकल्पांतर्गत सर्व आरोग्य केंद्रासाठी मिळून १३० आशा स्वयंसेविका शासनाने मंजूर केल्या आहेत. त्यानुसार आरोग्य केंद्रात त्यांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नेमण्यात आलेले आहे. मा. महासभा दि. ०६/०७/२०१३, ठराव क्र. अन्वये सदर आशा स्वयंसेविका यांना महानगरपालिका फंडातून दरमहा रु. ३,०००/- ठोक मानधन अदा करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त आशा स्वयंसेविका यांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येतो. तथापि सद्यस्थितीत इतक्या कमी मानधनामध्ये कार्यक्षेत्रात महिनाभर काम करणे परवडत नसलेबाबत तसेच मासिक मानधनात वाढ करणेबाबत वारंवार आशा स्वयंसेविका यांनी मा.आमदार, मा. महापौर, मा.आयुक्त यांच्याकडे तोंडी मागणी केलेली आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नियुक्त आशा स्वयंसेविका या वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व प्रसविका यांच्या मार्गदर्शनाखाली खालील नमूद केलेल्या कामात व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात वेळोवेळी सहभागी होत असतात.

आशा स्वयंसेविका यांच्या कामांची यादी खालीलप्रमाणे,

१. जननी सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थ्यांचा शोध घेऊन संबंधित माहिती प्रसविकांना देणे.
२. कुटुंब नियोजन पध्दतीचा वापर करणेबाबत प्रवृत्त करणे.
३. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी लाभार्थ्यांना प्रवृत्त करुन पाठपुरावा करणे.
४. कुटुंब नियोजन पध्दतीमधील PPIUCD करीता लाभार्थ्यांना प्रवृत्त करणे.
५. वर्षातून २ वेळा कुटुंब पाहणी सर्वेक्षणात प्रसविकांना मदत करणे.
६. लसीकरणाकरीता पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करणे.
७. लसीकरण सत्राच्या दिवशी लाभार्थ्यांना सत्राच्या ठिकाणी घेऊन येणे.
८. किशोरवयीन मुलींना समुपदेशन करणे.
९. ६ महिने ते ५ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना आयर्न सिरप वाटप करणे, पाठपुरावा करणे.
१०. जंतनाशक व जीवनसत्व "अ" मोहिमेत सहभागी होणे.
११. अतिसार नियंत्रण पंधरवडा दरम्यान कार्यक्षेत्रात ORS पॅकेट वाटप करणे.
१२. गोवर रुग्णांचा शोध घेऊन सर्वेक्षण करणे.

१३. प्रसूतिपूर्व तपासणीकरीता लाभार्थ्यांस आरोग्य केंद्रात घेऊन येणे.गृहप्रसवाचे प्रमाण थांबवून रुग्णालयीन प्रसुतिसाठी लाभार्थी, नातेवाईकांचे समुपदेशन करणे.

१४. रुग्णालयीन प्रसुतिकरीता लाभार्थ्यांना प्रवृत्त करणे, पाठपुरावा करणे.

१५. रुग्णालयातील बालमृत्यु, मातामृत्युबाबत वरिष्ठांना त्वरित कळवणे.

१६. Urban Health & Nutrition Day (UHND) दिवशी आरोग्य शिक्षण देणे.

१७. Mahila Arogya Samiti (MAS) कार्यान्वित करुन त्यांच्या कामाचे संनियंत्रण करणे.

१८. संशयित टी.बी रुग्णांचा सर्वेक्षणद्वारे शोध घेऊन मोफत तपासणी / उपचाराकरीता आरोग्य केंद्रात पाठविणे.

१९. संशयित हिवताप, हत्तीरोग रुग्णाबाबतची माहिती आरोग्य केंद्राना कळविणे.

२०. संसर्गजन्य, जलजन्य आजार, डासांमार्फत पसरणारे आजार याबाबत जनजागृती करणे.

२१. एडस् रुग्णांना मोफत सोयीसुविधा प्राप्त करुन देणेकरीता पाठपुरावा करणे.

२२. संशयित कुष्ठरोग रुग्ण शोधुन मोफत तपासणी / उपचाराकरीता आरोग्य केंद्रात पाठविणे.

२३. प्रधानमंत्री सुरक्षित मातृ वंदना योजनेच्या लाभार्थ्यांचा शोध घेऊन, कागदपत्रांची पूर्तता करणेकरीता त्यांना मदत करणे.

२४. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेच्या दिवशी पात्र लाभार्थ्यांना आरोग्य संस्थेत पाठविणे.

२५. कार्यक्षेत्रातील आरोग्यसंबधी समस्या वेळोवेळी वरीष्ठांना कळविणे.

यानुसार वरील नमूद केलेल्या विविध आरोग्य विषयक कामकाजात आशा स्वयंसेविकांचा मोलाचा सहभाग लक्षात घेता त्यांना अदा करण्यात येत असलेले मानधन हे अत्यंत कमी असल्याचे दिसून येत आहे. तरी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या मानधनात वाढ करुन त्यांना प्रतिमाह रु.६,०००/- एवढी मानधन वाढ करणेसाठी मा. महासभेस शिफारस करणे उचित वाटते. विचारविनिमयानंतर मा. महासभा मंजुरी देईल तेवढया मानधनाचीवाढ त्यांना देण्यात येईल.

सदरचा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील "अस्थायी आस्थापना / सुरक्षारक्षक" या लेखाशिर्षाखालील उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

उपरोक्त नमूदप्रमाणे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांर्गत नागरी आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या आशा स्वंयसेविकांच्या मानधनात वाढ करणेकामी निर्णय होणेस व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी उपरोक्त प्रस्ताव अवलोकनार्थ मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

गोषवारा प्राप्त दि. 30/08/2019 वेळ 04:40 PM
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 54 वर्ष :- 2019-20

30/08/2019
मिरा भाईंदर महानगरपालिका

(डॉ. संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**

**ता.जि.ठाणे, 401101**

**मा. महासभा**

**सभा दि.20/12/2019**

// गोषवारा //

**प्र.क्र.64:- अस्थायी बालवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शिक्षण विभागा अंतर्गत महानगरपालिकेच्या एकुण 26 बालवाडी सुरु आहेत. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासन आदेशान्वये मंजुर स्थायी बालवाडी शिक्षिका या पदावर शैक्षणिक अर्हता तसेच मागासवर्गीय अनुशेषाच्या अनुषंगाने 27 बालवाडी सेविकांची नेमणुक झालेली आहे. या व्यतीरीक्त् सदयस्थितीत 4 अस्थायी बालवाडी सेविका रु.11,000/- दरमहा या ठोक मानधनावर महानगरपालिकेत काम करीत आहेत.

1) श्रीम. वनिता सिंग, बालवाडी सेविका शाळा क्रं.30, भाईंदर (प.) या शाळेत बालवाडी वर्ग घेतात.
2) श्रीम. ज्योत्सना माछी, बालवाडी सेविका शाळा क्रं.26, राई गांव, भाईंदर (प.) या शाळेत बालवाडी वर्ग घेतात.
3) श्रीम. कुसुम बांरगुळे, बालवाडी सेविका इंदिरा नगर, कोठार, भाईंदर (प.) येथे बालवाडी वर्ग घेतात..
4) श्रीम. मंदाकिनी रुपवते, बालवाडी सेविका शाळा क्रं.20, मिरागाव येथे बालवाडी वर्ग घेतात.

तसेच वरील सर्व बालवाडी सेविका निवडणूकीचे BLO, पल्सपोलीओ, जनगनणा इ. कामे करतात.

सदर बालवाडी सेविका दि.20/01/2004 पासुन रु.1000/- या मानधनावर कार्यरत होत्या. दि.29/11/2008 च्या मा. महासभा ठराव क्रं.76 नुसार दि.01/12/2008 पासुन त्यांना रु.3900/- एवढे मानधन देण्यात येत होते. तद्नंतर दि.01/02/2011 रोजीच्या मा. महासभा ठराव क्रं.75 नुसार सदर बालवाडी सेविकांना रु.8000/- इतके मानधन मंजुर करण्यात आले. दि.30/01/2016 रोजीच्या मा. महासभा ठराव क्रं.118 नुसार रु.11000/- इतके मानधन मंजुर करण्यात आले.

शिक्षण विभागाच्या सन 2019-20 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील अस्थायी आस्थापना बालवाडी या लेखाशिर्षाअंतर्गत रु.15.00 लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी बालवाडी सेविकाच्या मानधनवाढीबाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर ठेवण्यास पुढील कार्यवाहीसाठी शिफारस आहे.

अतिरिक्त् आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२०/१२/2019

## // गोषवारा //

### बांधकाम विभाग

**प्रकरण क्रमांक (६६) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste ( C & D )) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामाबाबत.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 लागु झाले आहेत. या नियमांतर्गत बांधकाम व निष्कासनानुसार कचरा निर्माते कचऱ्याची साठवणुक त्यांच्या जागेत करतील व अधिकृत कचरा संकलन केंद्रावर किंवा प्रक्रीया केंद्रावर सशुल्क जमा करतील. सदर नियमाची अंमलबजावणी 5 ते 10 लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरांनी 24 महीन्यात करावयाची आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि.03/11/2018 ठराव क्र.99 अन्वये मिरा भाईंदर महानगपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 नुसार ठाणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीकडे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचरा देणेसाठी कार्यवाही करणेस तसेच बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 ची नागरीकांसाठी जाहीर सुचना प्रसिध्दी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. 7 मार्च 2019 रोजी पासुन वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 लागु केलेले आहेत. ठाणे महानगरपालिकेचे नेमलेल्या मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. हे कंत्राटदार ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या धोरणानुसार व दरानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत काम करण्यास तयार असल्याने त्यांच्या मंजुर दराचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे दर मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. मा. महासभेच्या मान्यतेनुसार ठाणे महानगरपालिकेने ठरविलेले खालील दर शुल्क वर्ग प्रकारानुसार मंजुर आहेत.

**"अ" लघु कचरा निर्माते :** एक मेट्रीक टनापेक्षा कमी कचऱ्याची निर्मिती.

**पर्याय :** 1. कचरा संकलन व वाहतुक करुन अधिकृत कचरा संकलन केंद्रावर जमा केल्यास शुल्क नाही.

2. कचरा निर्मात्याने कचरा निर्मितीच्या ठिकाणाहून अभियोक्त्याकडे कचरा उचलण्याकरीता मागणी केल्यास शुल्क रु.1089/-

**"ब" मोठे कचरा निर्माते :** एक टन व त्याहुन अधिक व 20 टनापर्यंत कचऱ्याची निर्मिती

**पर्याय :** 1. संकलन, वाहतुक प्रक्रिया करिता शुल्क रु.1089/- प्रती मे.टन.

2. प्रक्रिया केंद्रावर कचरा संकलन वाहतुक करुन प्रक्रियेसाठी जमा केल्यास शुल्क रु.545/- प्रती मे.टन

**"क" घाऊक कचरा निर्माते :** 20 टनाहून अधिक प्रती दिन अथवा 300 टन प्रती महिना / प्रती प्रकल्प कचरा निर्मात्याने कचरा व्यवस्थापन आराखडा विहित नमुन्यात मंजुरीकरिता सादर करणे बंधनकारक आहे. घनकचरा प्रकल्प खात्याने 30 दिवसात मंजुर करुन निर्धारित शुल्क भरणा केल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल. घाऊक कचरा निर्मात्याने कचऱ्याचे 4 प्रकारात

वर्गीकरण करुन साठवणुक करणे बंधनकारक राहील. संबंधित घाऊक कचरा निर्मात्याने वर्गीकृत कचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतुक केल्यास फक्त प्रक्रिया शुल्क रु.545/- प्रती मे.टन आकारण्यात येईल.

**"ड"** ठाणे महापालिकेमार्फत बांधकाम निष्कासन, रस्ते, विकास, इमारत बांधकाम इत्यादी स्थापत्य कामातुन निर्माण होणारा बांधकाम व निष्कासन कचरा संकलन व वाहतुक केल्यानंतर प्रक्रिया करणेकरिता रु.525/- प्रती मे.टन शुल्क आकारण्यात येईल. अभियोक्तामार्फत संकलन, वाहतुक व प्रक्रियेकरिता रु.1050/- प्रती मे.टन शुक्ल आकारण्यात येईल.

**"इ"** रस्ते, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, दुरध्वनी इत्यादी भुमिगत सेवा पुरविण्याचे कामातुन निर्माण होणारा बांधकाम व निष्कासन कचरा संकलन व वाहतुक केल्यानंतर सदर कचऱ्याच्या प्रक्रियेसाठी रु.545/- प्रती टन शुल्क आकारण्यात येईल.

**"फ"** सार्वजनिक / ठिकाणी / रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला / सखल नदी / नाले / पाणथळ / तलाव / तिवरे / जंगल इत्यादी ठिकाणी अनधिकृतपणे व अनिर्बंधपणे टाकलेला बांधकाम व निष्कासन कचऱ्याने संकलन, वाहतुक व प्रक्रिया या करीता अभियोक्त्यास 75% शुल्क अदा करण्यात येईल. उर्वरित दंड रुपात वसुल (म्हणजेच रु.788/- प्रती मे टन) झालेली रक्कम 90 दिवसात अभियोक्तास देण्यात येईल.

**दंड :** बांधकाम व निष्कासन कचरा निर्माते, वाहतुक ठेकेदार, शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था इत्यादीनी बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 चे पालन / पुर्तता न करण्याबाबत दंड रु.5000/- ते रु.20000/- विविध बाबींकरिता वसुल करण्यात येईल.

तथापी मा. स्थायी समिती सभा दि. 28/08/2019 ठराव क्र.51 अन्वये ठाणे महानगरपालिकेने नेमलेल्या मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. या कंत्राटदारास फक्त 6 महीन्याकरीता नेमावे व यापुढे बांधकाम व निष्कासन कचऱ्याची सदर कंत्राटरारामार्फत विल्हेवाट लावुन कचरा निर्माण करणाऱ्या मालकाकडुन सदर कंत्राटदाराने शुल्क आकारावे तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर प्रकल्प उभारणेची कार्यवाही करावी व त्याचा सविस्तर आराखडा मा. महासभेपुढे ठेवावा असा निर्णय घेतला.

मा. महासभा ठरावाच्या अनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर प्रकल्प उभारणेसाठी 5 एकर जागेची आवश्यकता आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दररोज 150 मेट्रीक टन बांधकाम व निष्कासन कचरा तयार होत असतो. सदर प्रकल्प ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर बांधा वापरा व हस्तातंर करा पध्दतीने उभा करता येईल. त्यासाठी ठाणे महानगरपालिकेने नेमलेल्या कंत्राटदारासोबत करारनामा करणे अथवा मिरा भाईंदर महानगरपालिकेत स्वंतत्र प्रकल्प उभारण्यासाठी 5 एकर जागा उपलब्ध करुन देणे याबाबत निर्णय होणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि. ०४।११।२०१९ ०२:३० वा.
~~मा. स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ५८ वर्ष : २०१९/२०

०४/११/२०१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(बालाजी खतगांवकर)
४/११/१९
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2019-20/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२०/१२/2019

## // गोषवारा //

## मिळकत विभाग

**प्रकरण क्रमांक (६७) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत विकसीत करण्यात आलेल्या कम्युनिटी हॉलच्या वापरासाठी भाडे दर निश्चित करणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत भाईंदर (पश्चिम) विनायक नगर तसेच मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 178 या जागेत कम्युनिटी हॉल बांधण्यात आलेले आहेत. सदर ठिकाणी बांधण्यात आलेल्या कम्युनिटी हॉल नागरीकांना विविध कार्यक्रमांना वापरण्यासाठी भाडे दर निश्चित होणे आवश्यक आहे, जेणेकरून नागरीकांना त्यांच्या सार्वजनिक कार्यक्रमांसाठी स्वस्त दरात सभागृह उपलब्ध होऊन महानगरपालिकेस देखील सदर इमारतीच्या देखभालीसाठी निधी जमा होऊ शकेल. सदर हॉलच्या वापरासाठी खालीलप्रमाणे भाडे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **वातानुकूलित सभागृह** | - **रू.7,000/- प्रति दिन** |
| | - **रू.10,000/- अनामत रक्कम** |
| | - **रू.10/- प्रति युनिट वीज वापर चार्ज एसी वापरल्यास** |
| **नॉन एसी सभागृह** | - **रू.5,000/- प्रति दिन** |
| | - **रू.10,000/- अनामत रक्कम** |

सदर दोन्ही इमारतींची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करणे व संचलन महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कर्मचारी नेमून करण्यात येतील. तरी वरीलप्रमाणे दर व वापराबाबत धोरण निश्चित होणेबाबत विचार विनिमय करून निर्णय होणेस शिफारस आहे.

5/11/19

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2019-20/MG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. २० / १२/२०१९.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.: ६८ भाईंदर (पुर्व), येथिल फाटक जलकुंभ येथून मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे (खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे) कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

महानगरपालिकेद्धारे मनपा हद्दीतील नागरीकांना आवश्यकतेनुसार टँकरद्धारे पाणी पुरवठा करण्याचे मनपाचे धोरण आहे. सदर टँकर पाणी पुरवठा हा जलवाहिनी नसलेल्या इमारतींना तसेच जलवाहिन्यांच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या इमारतींना व खाजगी कार्यक्रमांना मागणी केल्यास मनपामार्फत रु.१,०००/- प्रति फेरा इतके दर आकारुन टँकर पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसरात प्रति टँकर रु.५००/- शुल्क आकारुन टँकर पुरविण्यात येतात. आदिवासी पाडे, धार्मिक स्थळे, धार्मिक कार्यक्रम व दुषित पाणी पुरवठा होणाऱ्या इमारती, तसेच मनपाचे कार्यालये यांना मोफत पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेचे दायित्व आहे. सदर योजना ना नफा ना तोटा या तत्वावर राबविली जाते. उपरोक्त टँकर मनपा भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा केला जातो.

तरी सदर कामी वार्षिक अंदाजित खर्च रक्कम रु. २,००,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त

मिरा-भाईंदर महानगरपालिका 15/11/19

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२०/१२/२०१९
## बांधकाम विभाग
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक. ( ६९) :-** घोडबंदर प्रवेशव्दारासमोर शिवाजी महाराजपुतळा बसविणे व चौकाचे सुशोभिकरण करणे कामाच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन मेट्रो-9 अंतर्गत काम सुरु असून राष्ट्रीय महामार्ग - 08 छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते वीर सावकर चौक (गोल्डन नेस्ट पर्यत रस्त्याच्या मध्यभागातुन मेट्रो जात आहे. सदर कामांतर्गत दुभाजक मोकळे करुन द्यावयाचे आहे. घोडबंदर ते जैसलपार्क या 60 मी. रुंदीच्या रस्त्यातंर्गत घोडबंदर सगणादेवी मंदिराजवळी श्री.छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सुशोभिकरण करुन अश्वारुढ पुताळा बसविणे कामी मा.विशेष महासभा दि.02/03/2019 ठराव क्र.136 अन्वये प्रशासकीय आर्थिक मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार पुतळा बसविणे कामी ई निविदा प्रक्रिये अंती रु.2.95 कोटी चा प्रस्ताव व प्राप्त झाला असून सुशोभिकरण कामासाठी रु.65.93 लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी निविदा प्रक्रिया करावयाची आहे. तरी सदर कामासाठी सुधारीत रु.3.61 कोटी रक्कमेचा अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-09/VP/2019-20/YJSt-5

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - 401 101
दुरध्वनी क्र. : 819 2828.

## // गोषवारा //

### मा. महासभा दि. 20 /12 /2019

**प्रकरण क्र 40 :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामी वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक प्रशासकिय मंजूरीबाबत.**

वरील विषयानुसार अहवाल सादर करण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची विविध विभागात ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी एक वर्षाकरिता मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना दिलेला वाहनचालक पुरविण्याची मुदत दि. 31/12/2019 रोजी संपुष्टात येणार आहे. तत्पूर्वी ऑनलाईन निविदा प्रसिध्द करून नविन ठेकेदार निश्चित करणे आवश्यक आहे.

सन 2019-20 या अर्थसंकल्पात अस्थायी आस्थापना / ठेका वाहनचालक व अग्नीशमन अस्थायी आस्थापना / सूरक्षा रक्षक / वाहन चालक या लेखाशिर्षात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशीर्ष | लेखा सांकेतांक | सन 2019-20 करिता अर्थ संकल्पिय तरतूद | शिल्लक तरतूद |
|---|---|---|---|---|
| 1. | अस्थायी आस्थापना / ठेका वाहन चालक खर्च | 2120 | 1.25 कोटी | 46,42,568 |
| 2. | अग्नीशमन अस्थायी आस्थापना / सूरक्षा रक्षक / वाहन चालक | 2120 / 2572 | 2.50 कोटी | 32,14,394 |
| | एकूण | | 3.75 कोटी | 78,56,962 |

वरीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली असून वरील लेखाशिर्षानुसार सामान्य प्रशासन, वैदयकिय आरोग्य विभाग, उदयान विभाग, अग्निशमन विभाग या विभागात कार्यरत ठेका वाहनचालक यांचे दरमहा रु. 22.00 लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तरी महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी एका वर्षाकरिता निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

उप-आयुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 20/02/2019

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक. ( 09)** - मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालये यांचे दैनंदिन संचलन, देखभाल, दुरूस्ती करणे कामाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची एकूण 187 सार्वजनिक शौचालये असून त्यामध्ये 3635 सीट्स उपलब्ध आहेत. सदर शौचालयांची दैनंदिन दुरूस्ती तसेच दैनंदिन साफसफाईसाठी स्वतंत्र यंत्रणा नेमण्यात आलेल्या आहेत. मा. महासभा दि.07/06/2019, ठराव क्र. 24 अन्वये दैनंदिन दुरूस्ती व साफसफाई कामासाठी एकच निविदा मागविणेसाठी तसेच मा. महासभा दि.13/02/2019, ठराव क्र. 125 अन्वये पैसे द्या व वापरा तत्वावर चालविण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाकडील दि.10 जुलै 2007 रोजीच्या निर्णयानुसार शौचालय बांधणे, शौचालयांची स्वच्छता, देखभाल व दुरूस्ती / गटार बांधकाम व दुरूस्ती तसेच शौचालय बांधकामाला लागणारा स्वच्छता विषयक सर्व साहित्य खरेदी आदी कामांचे कंत्राट वाल्मिकी, मेहतर समाजातील सफाई कर्मचारी, कुटूंबियाच्या शासन नोंदणीकृत सहकारी संस्था, सॅनिटरी मार्ट यांना प्राधान्याने देण्याबाबत निर्देश आहेत. त्या अनुषंगाने निविदामध्ये कंत्राटारामार्फत साफसफाई कामे सदर निर्देशानुसार देण्याची अट समाविष्ट करण्यात आली होती. तथापी सदर निविदेनुसार पात्र कंत्राटदार न मिळाल्याने सदर निविदा रद्द करण्यात आलेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शौचालयांची साफसफाई करण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम 1970 नुसार किमान वेतन व इतर लाभ देणे बंधनकारक आहे.

तथापी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सफाई करीता नेमलेल्या संस्थांमार्फत किमान वेतन व इतर सुविधा देण्यात येत नसल्याच्या तक्रारी होत असून शौचालयातील साफसफाई साठी किमान दोन शिफ्ट मध्ये कर्मचारी नेमणूक होणे आवश्यक वाटते. शौचालयातील केअर टेकर रूममध्ये सदर कर्मचाऱ्यांना राहण्याची देखील व्यवस्था असून शौचालयाच्या स्वच्छतेसोबत देखरेख व सुरक्षेची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. तसचे शौचालयांची स्वच्छता व निगा तसेच दुरूस्तीसाठी एकच यंत्रणा न नेमता विभाग निहाय यंत्रणा नेमल्यास नियंत्रण ठेवणे सुलभ होईल. तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालयांची दैनंदिन साफसफाई, सुरक्षेसह आवश्यक सर्व दुरूस्ती कामे करण्यासाठी तसेच वापर करणाऱ्यांकडून प्रति कुटूंब शुल्क वसूल करणे, प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चापेक्षा शुल्काची वसूल न झाल्यास महानगरपालिकेमार्फत रक्कम देणे याबाबतचे धोरण निश्चित करून विभागवार वाल्मिकी, मेहतर समाजातील सफाई कर्मचारी कुटूंबियांच्या शासन नोंदणीकृत सहकारी संस्था, सॅनिटरी मार्ट यांना प्राधान्याने कामे देण्याचे धोरण निश्चित करणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर) 5/2/19
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2019-20/MG-6

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.20/12/2019**

**सार्व. आरोग्य विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. :- 02 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमितील जळाऊ लाकडे पुरवठा कामास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातून उत्तन, मोर्वागाव, राईगाव, मुर्धागाव, भाईंदर (प.) भोलानगर, भाईंदर (पूर्व) बंदरवाडी, गोडदेव, नवघर, मिरारोड, पेणकरपाडा, काशिगाव, घोडबंदर गाव, रेतीबंदर, चेनागाव याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या एकुण 14 स्मशानभुमी आहेत.

सदरच्या स्मशानभुमीमध्ये प्रेत दरनाकरीता जळाऊ लाकडे पुरवठा करणे कामाचा वार्षिक ठेका मे.एम.डी. दावडा यांना देण्यात आलेला आहे. सदर वार्षिक ठेक्याची मुदत माहे फेब्रुवारी 2019 मध्ये पुर्ण् होत आहे. त्यामुळे स्मशानभुमी करीता जळाऊ लाकडे खरेदी करणेकामी नव्याने निविदा मागविणे आवश्यक आहे.

सदर कामी सन 2019-20 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात बेवारस प्रेत विल्हेवाट /लाकडे खरेदी करणे या लेखाशिर्षाखाली रु. 75,00,000/- इतकी तरतुद करण्यात आली आहे.

स्मशानभुमी करीता जळाऊ लाकडे खरेदी करणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे सदर कामी प्रती वर्षी निविदा प्रक्रिया करणे, निविदेस मान्यता घेणे, याकामी बराच कालावधी लागतो. त्यामुळे याकामी 03 वर्षाकरीता नव्याने निविदा मागवून दर निश्चित करणे तसेच निविदेस अंतिम मंजुरी प्राप्त होईपर्यंत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या निविदाकारास कामाची मुदतवाढ देणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

**(डॉ संभाजी पानपट्टे)**
**उपआयुक्त(आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Fire wood Goshwara 2019.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २० / १२/2019

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ०३ - मौजे घोडबंदर, स.क्र. 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 79/1,3,4, 75/1 या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे बांधकामाबाबत.

मिरा भाईंदर शहरासाठी विकास योजना मंजूर होणेपुर्वी विषयांकित जागेसाठी जा.क्र. नपा/नर/2805/7885/94-95, दि.02/01/1995 अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला देण्यात आलेला असून त्यानंतर सदर जागेसाठीचे मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील जा.क्र. महसूल/कक्ष-1/टे-7/एनएपी/एसआर-1/95, दि.15/04/1995 अन्वयेच्या अकृषिक परवानगीच्या आदेशासह बांधकाम परवानगी मिळणेस विनंती केल्याप्रमाणे जा.क्र. मनपा/नर/349/6217/95-96, दि.25/09/1995 अन्वये बांधकाम परवानगी व जा.क्र. नपा/नर/124/1143/96-97, दि.24/05/1996 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीप्रमाणे विकासकांनी जागेवर बांधकाम सुरु करुन सदर जागेच्या मंजूर रेखांकनामधील सदनिका / गाळे / ऑफिसेस यांची विक्री केलेली आहे.

त्यानंतर मिरा भाईदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14 मे 1997 अन्वय मंजूर करण्यात आलेली असून, दि.15 जुलै 1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25 ऑगस्ट 2000 अन्वये मंजूर झालेली असून, दि.15 ऑक्टोबर 2000 पासून अंमलात आलेली आहे.

सदर मंजूर विकास योजनेप्रमाणे विषयांकित जागेच्या मंजूर रेखांकनातील "गौरव एन्क्लेव्ह" या गृहप्रकल्पाच्या स.क्र. 75/1 या जागेमधील (तळ + 1) स्वरुपाचे शॉपिंग सेंटर हे आ.क्र. 305 (बगीचा) या आरक्षणाने बाधीत होत आहे.

सदरचे शॉपिंग सेंटर सद्यस्थितीत आ.क्र. 305 (बगीचा) या आरक्षणामध्ये येत असून जागेवर मालकांनी सदर शॉपिंग सेंटरला किरकोळ दुरुस्तीसह प्लास्टर करुन त्यामध्ये हॉटेल सुरु करणेसह या इमारतीस भोगवटा दाखला मिळणेस संदर्भिय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

सबब सदर शॉपिंग सेंटरची (तळ + 1) स्वरुपाची इमारत सद्यस्थितीत आ.क्र. 305 (बगीचा) या आरक्षणाने बाधीत होत असल्यामुळे सदर इमारतीसाठी भोगवटा दाखलासह किरकोळ दुरुस्ती व त्या इमारतीमध्ये हॉटेलचा व्यवसाय सुरु करणेस परवानगी द्यावी किंवा कसे ? याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मिळणेकरिता पत्र क्र. मिभा/मनपा/नर/434/2019-20, दि.25/04/2019 अन्वये पाठविले असता, मा. शासनाने पत्र क्र. टिपीएस-1219/1564/19/नवि-12, दि.23/07/2019 अन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

मिरा भाईदर शहराची विकास योजना दि.14/05/1997 रोजी व वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली आहे. तसेच सदर विकास योजना सन 1992 मध्ये प्रसिध्द झालेली आहे. मिरा भाईदर शहराची विकास योजना सन 1992 मध्ये प्रसिध्द झाल्यानंतर त्यामधील प्रस्तावित आ.क्र. 305 (बगीचा) ने बाधीत जागेवर मिरा भाईदर महानगरपालिकेने विकासकास परवानगी दिल्याचे दिसून येते. सबब सदर परवानगी नियमानुसार नसून मंजूर विकास योजनेनुसार बांधकामा खालील जागा आ.क्र. 305 (बगीचा) ने बाधीत होत असल्याने सदर आरक्षणात फेरबदल झाल्याशिवाय प्रस्तावित वापर अनुज्ञेय होणार नाही.

वरीलप्रमाणे शासनाच्या अभिप्रायानुसार मौजे घोडबंदर, स.क्र. 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 75/1, 79/1,3,4 या जागेमधील, आ.क्र. 305 (बगीचा) ने बाधीत विद्यमान (वाणिज्य वापराच्या) बांधकामाबाबत महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

महाराष्ट्र शासन

क्रमांक:-टिपीएस- १२१९/१५६४/ १९/नवि-१२
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- २३ जुलै, २०१९.

प्रति,

आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (पश्चिम).

**विषय** :- मौजे घोडबंदर, स.क्र.७२/२, ७३/१-२-३-४, ७४/१-२, ७९/१-३-४ या जागेमधील विदयमान (वाणिज्य वापराच्या) बांधकामाबाबत...

**संदर्भ** :- आपले पत्र क्र.मिभा/मनपा/नर/७६२/२०१९-२० दि.२२/५/२०१९.

महोदय,

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विषयांकित जागेवर दि.२५/९/१९९५ रोजी रहिवासी व वाणिज्य वापरासाठी अर्जदार श्री.संतोष कृष्णा पुत्रण यांना बांधकाम परवानगी दिलेली असून त्यानंतर दि.२४/५/१९९६ रोजी सुधारीत बांधकाम परवानगी दिल्याचे आपण दि.२२/५/२०१९ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे. विकासकाने बांधकाम परवानगीनुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असून त्यामधील वाणिज्य वापराचे तळ+१ मजल्याचे (Shopping Centre) बांधकाम मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र.३०५ (बगीचा) ने बाधित होत असून सदर आरक्षणाने बाधित बांधकामाची किरकोळ दुरुस्ती करणे व त्यामध्ये हॉटेल व्यवसाय सुरु करणेबाबत विकासकाने महानगरपालिकेकडे परवानगी मिळणेबाबत अर्ज केला आहे. तसेच सदर बांधकामास भोगवटा दाखला मिळणेची सुध्दा अर्जदाराची विनंती असून याबाबत महानगरपालिकेने शासनाचे मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे.

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना दि.१४/५/१९९७ रोजी व वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/८/२००० रोजी मंजूर झालेली आहे. तसेच सदर विकास योजना सन-१९९२ मध्ये प्रसिध्द झालेली आहे. मिरा-भाईंदर शहराची विकास योजना सन-१९९२ मध्ये प्रसिध्द झाल्यानंतर त्यामधील प्रस्तावित आ.क्र.३०५ (बगीचा) ने बाधित जागेवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विकासकास परवानगी दिली असल्याचे दिसून येते.

सबब, सदर परवानगी नियमानुसार नसून मंजूर विकास योजनेनुसार बांधकामाखालील जागा आ.क्रं.३०५ (बगीचा) ने बाधित होत असल्याने सदर आरक्षणात फेरबदल झाल्याशिवाय प्रस्तावित वापर अनुज्ञेय होणार नाही, असे आपणास कळविण्याचे मला निदेश आहेत.

आपला,

(अशोक का. खांडेकर)
कार्यासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २० / १२/2019

## // सुधारीत गोषवारा //

**प्रकरण क्र. (१४)** :- चेना येथील ठाणेकडे जाणा-या 30.00 मी. रुंद रस्तयापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. 98 पर्यंतचा 18.00 मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये फेरबदल करणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसुचना टिपीएस-1296/847/सीआर-162/युडी-12 दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना क्र.टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12 दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासुन अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-1208/1346/प्रक्र.267/08/नवि-12 दि.21/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झालेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पाटील पाडा, बेलकरीपाडा व इतर रस्त्याकडे जाण्यासाठी नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता प्रस्तावित करण्यात आला होता. सदरचा विषय मा. महासभेची मंजुरी मिळणेस प्रशासनाने दि.04/06/2019 रोजी गोषवारा दिलेला होता. तथापि मा. महासभेने दि.1/06/2019 रोजी झालेल्या महासभेत फेरबदल दर्शविणारा नकाशा सादर केलेला नसल्यामुळे प्रकरण फेरसादर करणेस मा. महासभेने ठराव मंजुर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना येथील पाटीलपाडा व बेलकरीपाडा ही दोन आदिवांसी पाडे अस्तित्वात असून सदरील पाडयांस जाण्याकरीता पक्के रस्ते अजुनही उपलब्ध नाही. त्यामुळे तेथिल स्थानिक रहिवाश्यांना दैनंदिन कामकाजासाठी कच्चा रस्त्यावरुन चालत जावे लागते.

सद्यस्थितीत सदरील पाडयांकडे जाण्यासाठी स.क्र.147 मधील हॅरीटेज हॉटेलपासून स.क्र.119 पर्यंत नदीलगत 6.00 मी. रुंदीचा डांबरी रस्ता सार्वजनिक विभागामार्फत विकसीत करण्यात आलेला असूनसदरील रस्ता विकास योजनेत दर्शविलेला नाही. सदर रस्ता हा दोन्ही पाड्यांपर्यंत जात नसून अर्ध्यावरती संपुष्टात येत आहे. सबब हॉटेल हिल व्हयु पासून चेना नदीवरील जुन्या पुलापर्यंत 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता विकास योजनेत दर्शविलेला आहे. तथापि सदर भागातील पाटीलपाडा, बेलकरीपाडा व इतर रस्त्याकडे जाण्यासाठी नियोजनाच्या दृष्टीने सदर भागातील रहिवाश्यांना रस्त्याचा वापर करता यावा यासाठी खालीलप्रमाणे यासोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता प्रस्तावित करावयाचा आहे.

घोडबंदर कडून ठाणे कडे जाण्यासाठी 30.00 मी. रुंद रस्त्यापासून भाग नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे "अे" ते "बी" पर्यंतचा मंजूर विकास योजनेप्रमाणे 12.00 मी. रुंदीच्या प्रस्तावित केलेल्या रस्त्यास 18.00 मी. रुंदीचा प्रस्तावित करावयाचा आहे.

बी" ते "ई" पर्यंतचा रस्ता नदी ओलांडून नव्याने 18.00 मी. रुंदीचा प्रस्तावित करावयाचा आहे.

तसेच "ई" ते "जी" मंजूर विकास योजनेप्रमाणे 12.00 मी. रूंदीचा प्रस्तावित केलेला रस्ता 18.00 मी. रूंदीचा प्रस्तावीत करावयाचा आहे

वरील प्रमाणे भाग नकाशामध्ये दर्शविल्यानुसार "अे" ते "बी" व "ई" ते "जी" पर्यंत 12.00 मी. ऐवजी 18.00 मी. रुंदीचा व "बी" ते "एफ" पर्यंत 18.00 मी. रुंदीचा रस्ता नदी ओलांडून नव्याने प्रस्तावित करणेसाठी मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी सादर.

(बालाजी खतगांवकर) २२/११/१९
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि.२० /१२ /2019

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ०४ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता स्थापन करण्यात आलेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समिती बाबत.**

जैविक विविधता अधिनियम 2002 मधिल कलम 41 अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला त्यांचे अधिकार क्षेत्रात जैविक विविधता व्यवस्थापन समिती (BMC) गठित करण्यास मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार जैविक विविधता व्यवस्थापन समिती स्थापन करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच मा. राष्ट्रीय हरित लावद, नवी दिल्ली यांचे ओरीजनल ॲप्लीकेशन क्र. 347/2016 मध्ये दि.09/08/2019 रोजीचे आदेश देण्यात आलेले आहेत.

तसेच प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात जैविक विविधता व्यवस्थापन समित्या (BMC) दि.30/09/2019 पर्यंत स्थापन करण्याबाबत मराजैविविमं/कक्ष-3/न्याप्रक 347/602/201 दि.12/09/2019 रोजी मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळ, नागपूर व मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.11/10/2019 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. तथापी मा.विधानसभा 2019 ची आदर्श आचारसंहिता दि.27/10/2019 रोजी संपुष्टात आलेली होती तदनंतर मा.महासभा आयोजित करण्यात आलेली नाही. त्यामुळे तातडीची बाब म्हणून मिरा भाईदर महानगरपालिकेमध्ये जैव विविधता अधिनियम 2008 मधील कलम 23 नुसार मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राकरीता मा.आयुक्त सो यांच्या दि.21/11/2019 रोजीच्या आदेशान्वये जैविक विविधता व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

तरी मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राकरीता स्थापन करण्यात आलेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीचे मा.महासभेमध्ये माहितीस व मान्यतेस शिफारस आहे.

30/11/19

**(बालाजी खतगावकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 403 /2019-20
दिनांक :- 21 / 11 /2019

## मिरा भाईंदर महानगरपालिका स्तरावर गठीत करावयाच्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीबाबतचा आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता जैविक विविधता कायदा 2002 च्या कलम 41(1) आणि महाराष्ट्र जैविक विविधता नियम 2008 चे कलम 23 नुसार खालीलप्रमाणे जैविक विविधता समिती स्थापन करण्यात येत आहे.

**कार्यकारी मंडळ**

| अ.क्र | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| 1 | मा. महापौर सौ. डिंपल मेहता. | अध्यक्ष |
| 2 | श्रीम. भोईर सुनिता शशीकांत | महिला सदस्य |
| 3 | श्रीम. कांगणे मीना यशवंत | महिला सदस्य |
| 4 | श्रीम. हसनाळे ज्योत्सना जालींदर | अनुसुचित जाती/जमाती सदस्य |
| 5 | श्रीम. शिंदे रुपाली वसंत (मोदी) | अनुसुचित जाती/जमाती सदस्य |
| 6 | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत. | सदस्य |
| 7 | श्री.हरिश्चंद्र रामचंद्र आमगांवकर | सदस्य |
| 8 | श्री. जुबेर अब्दुला इनामदार | सदस्य |
| 9 | उप. आयुक्त (उद्यान) | सचिव (पदसिध्द) |
| | **स्थानिक स्तरावरील विविध क्षेत्रातील तज्ञ.** | |
| 1 | वनस्पती शास्त्रज्ञ (वैदू) प्रतिनिधी | सदस्य |
| 2 | कृषी शास्त्रज्ञ प्रतिनिधी | सदस्य |
| 3 | अकाष्ठ वनोपज संकलन करणाऱ्यांचा किंवा वापर करणाऱ्यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| 4 | मच्छिमार करणाऱ्यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| 5 | जैविक विविधतेचा उपयोग करणाऱ्या संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| 6 | लोक समुह कार्यकर्ता प्रतिनिधी | सदस्य |
| 7 | ज्ञानार्जन (शिक्षण) क्षेत्रातील प्रतिनिधी | सदस्य |
| | **निमंत्रित सदस्य** | |
| 1 | वनविभाग स्थानिक अधिकारी | सदस्य |
| 2 | कृषी विभाग (जलसंधारण) स्थानिक अधिकारी | सदस्य |
| 3 | पशु संवर्धन विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य |
| 4 | आरोग्य विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य |
| 5 | मत्स्यव्यवसाय विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य |
| 6 | शिक्षण विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य |
| 7 | अदिवासी विकास विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य |

| विशेष निमंत्रित सदस्य | | |
|---|---|---|
| 1 | विधान सभेचे विदयमान सदस्य | सदस्य |
| 2 | लोक सभेचे विदयमान सदस्य | सदस्य |

**जैविक विविधता व्यवस्थापन समितीचे कामकाज खालीलप्रमाणे असेल**

1. समितीच्या अधिकारीता क्षेत्रातील जैविक संसाधनांचे संरक्षण आणि त्या संसाधनाची शाश्वत निरंतर उपयोगीता निश्चित करणे.
2. समितीच्या अधिकारीतेमधील जैविक संसाधन क्षेत्रामध्ये बेकायदेशीर प्रवेशावर बंदी घालणे.
3. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण चेन्नई आणि महाराष्ट्र राज्य जैविक विविधता मंडळाला गरज भासेल तेव्हा विविध विषयावरील माहिती / मते सादर करणे.
4. समितीच्या अधिकारीतेमधील जैविक संसाधन क्षेत्रातील संसाधने व्यावसायीक कारणाकरीता गोळा करण्यासाठी / तेथे प्रवेश करण्यासाठी नियमानुसार संकलन शुल्क आकारणीची वसूली करणे.
5. स्थानिक वैदू आणि जैविक संसाधनाचा वैदयक क्षेत्रात वापर करण्याची माहिती ठेवणे.
6. जैविक संसाधन असलेल्या क्षेत्रात प्रवेश करणे आणि पारंपारीक ज्ञान प्राप्त करणे, आकारलेले संकलन शुल्क आणि मिळालेले लाभ आणि त्यालाभाचे वाटपाची पध्दत इत्यादीचा सर्व तपशिल असलेली नोंदवही ठेवणे.
7. जैविक विविधतेचा दस्तावेज तयार करण्यात आणि त्याच्याशी संबंधित पारंपारीक ज्ञान / माहिती मिळवण्यात सुध्दा जैविक विविधता व्यवस्थापन समिती सक्रिय असेल.
8. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य जैविक विविधता मंडळाने वेळोवेळी दर्शवलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे जैविक विविधता निधिचे व्यवस्थापन व वापर करणे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

21/11/19.

E:\2019-20\Bio Diversity\Letter head all

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/१२/२०१९**

**।। गोषवारा ।।**

**प्रकरण क्र. :-** ७६

**विषय** :- आरक्षण क्र. २१७ येथे पहिल्या मजल्यावर डायलिसिस केंद्र चालू करणेसाठी धर्मादाय संस्थेस जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. २१७ येथील इमारतीतील महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेल्या जागेत पहिल्या मजल्यावर डायलिसिस केंद्र चालू करण्यासाठी "श्री. वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ (मेवाड) मुंबई" या धर्मादाय संस्थेने महानगरपालिकेकडे प्रस्ताव दिला आहे. संस्थेच्या प्रस्तावानुसार सदर जागेत पाच डायलिसिस मशीन्सच्या साहयाने किमान दहा वर्षासाठी संस्था डायलिसिस केंद्र चालवू इच्छिते. सदर केंद्राव्दारे कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व जातिधर्मांच्या रुग्णांसाठी डायलिसिस सेवा उपलब्ध करुन दिली जाईल. सदर केंद्राव्दारे महानगरपालिका आकारत आहे तेवढेच शुल्क (रु. २०० प्रति डायलिसिस) रुग्णांकडून आकारले जाईल. सदर शुल्क संस्थेकडे जमा होईल. डायलिसिस केंद्र स्थापन करण्यासाठी इमारतीत करावयाची बांधकामविषयक कामे, अंतर्गत बदल, R O Plant ची उभारणी, डायलिसिस मशीन्स, रुग्णखाटा, कन्झ्युमेबल्स, वातानुकुलन यंत्रे, सर्व यंत्रांची देखभाल व दुरुस्ती तसेच केंद्रासाठी आवश्यक वैद्यकीय तज्ज्ञ व इतर कर्मचारी संस्थेमार्फत नेमले जातील. सुरुवातीच्या टप्प्यात संस्थेमार्फत पाच डायलिसिस मशीन्स कार्यान्वित केली जातील. आवश्यकतेनुसार भविष्यात मशीन्सची संख्या वाढविण्यात येईल. महानगरपालिकेमार्फत सदर डायलिसिस केंद्रासाठी पाणी व वीज विनामूल्य उपलब्ध करुन दिली जाईल. तसेच संस्थेचे काम समाधानकारक असल्यास दहा-दहा वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत स्वर्गीय भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे डायलिसिस केंद्र चालविले जाते. त्या ठिकाणी सद्यस्थितीत आठ मशीन्सव्दारे डायलिसिस सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. मात्र सदर मशीन्सची संख्या अपुरी पडत असून बऱ्याच रुग्णांना प्रतिक्षा यादीमध्ये राहावे लागत आहे. सदर संस्थेमार्फत डायलिसिस केंद्र चालू केल्यास बऱ्याच गोरगरीब रुग्णांना अल्प दरात डायलिसिस सेवा उपलब्ध होईल.

तसेच महानगरपालिकेला सदर केंद्रासाठी काहीही भांडवली गुंतवणुक करावी लागणार नाही. जागा, पाणी व वीजपुरवठा वगळता सर्व खर्च सदर संस्थेमार्फत करण्यात येईल.

तरी "श्री. वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ (मेवाड) मुंबई" या संस्थेस डायलिसिस केंद्र चालू करण्यासाठी आरक्षण क्र. २१७ येथील पहिला मजला विनामूल्य उपलब्ध करुन देणे, डायलिसिस केंद्रासाठी आवश्यक वीज व पाणीपुरवठा विनामूल्य उपलब्ध करुन देणे तसेच भविष्यात मशीन्सची संख्या वाढविणेसाठी वाढीव जागेची गरज भासल्यास मा. आयुक्त यांना त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार प्रदान करणेसाठी सदरचा प्रस्ताव विचारविनिमय व आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मा. महासभेपुढे सविनय सादर.

(बालाजी खतगांवकर) 11/12/19

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/१२/२०१९

## गोषवारा

**प्रकरण क्र. ७७** :- मा. महासभा ठराव क्र. ६० दि. २०/०२/२०१८ व मा. महासभा ठराव क्र. २१ दि. ०७/०६/२०१९ च्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थांच्या कर आकारणी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची प्रकरण २ मधील नियम १(र) नुसार फेर निर्णय घेणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात सवलत देणे बाबत महाराष्ट्र नगरपालिका एकत्रीत मालमत्ता कर अधिनियम १९६९ नियम १०(२) अन्वये नगरपरिषदांकरीता तरतुद असल्याने तत्कालीन नगरपरिषद कालावधीत काही शैक्षणिक संस्थांना सामान्य करात ५०% सुट देण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८/०२/२००२ पासुन अस्तित्वात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस मालमत्ता करासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागु आहते. सदरहु अधिनियमात शैक्षणिक संस्थाना सुट देण्याची तरतुद नसल्याने महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर अस्तित्वात आलेल्या शैक्षणिक संस्थांना बिगरनिवासी दराने कर आकारणी करण्यात आलेली असुन त्यांना कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात आलेली नाही. तथापी ठराव क्र. २६ दि. २०/०२/२००८ व ठराव क्र. ५२ दि. ३०/१२/२०११ अन्वये मा. महासभेने मालमत्ता करामध्ये ५०% सवलत व निवासी दराने कर आकारणी करणेबाबत ठराव पारीत केलेला आहे. त्यानुसार कर आकारणी करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. परंतु सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील शैक्षणीक संस्थांच्या कर आकारणीबाबत महालेखापाल यांनी शैक्षणिक संस्थांना देण्यात येत असलेल्या सवलती व निवासी दराने कर आकारणी करणेबाबत आक्षेप घेतलेला आहे.

मा. महासभाने पुनःश्च दि. २०/०२/१८ ठराव क्र. ६० अन्वये महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थाना रु. २.४०/- प्र.चौ.फु. दराने कर आकारणी करण्यांस मान्यता देऊन **महानगरपालिका हद्दीतील मालमत्तेस दि. १/४/१८ पासून नविन कर आकारणी करताना ज्या शिक्षण संस्थेच्या स्वतंत्र इमारती असतील त्या शिक्षण संस्थांना ठरावात मंजूर केलेल्या दराच्या ५०% कर आकारणी करण्यांत यावी. तसेच दि. ३१/३/१८ पर्यंत कर आकारणी केलेल्या मालमत्तांचे अर्ज महानगरपालिकेस प्राप्त होतील व ज्या शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेवर यापूर्वी आकारणी झाली असेल त्यांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या प्रचलित दराच्या ५०% दराने दि. ०१/०४/२०१८ पासून कर आकारणी करण्यांत यावी.** असा ठराव पारीत केलेला आहे.

दि. २०/०२/२०१८ रोजी मा. महासभेच्या पारीत ठराव पहाता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीशी ठराव सुसंगत नसल्याने सदर ठरावाची अंमलबजावणी केल्यास शैक्षणिक संस्थांच्या कर आकारणीत असमानता निर्माण होऊन अस्पष्टता येत असल्यामुळे जिल्ह्यातील इतर महानगरपालिकेकडुन शैक्षणिक संस्थांना केलेल्या कर आकारणी बाबतची माहिती संकलीत केली असता खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

१) वसई विरार महानगरपालिका :- वाणिज्य वापर दराने कर आकारणी, सवलत नाही.

२) ठाणे महानगरपालिका :- वाणिज्य वापर दराने कर आकारणी, सवलत नाही.

३) भिवंडी महानगरपालिका :- निवासी दराने कर आकारणी, सवलत नाही.

अश्याप्रकारे अन्य महानगरपालिका शैक्षणिक संस्थांना लागु करण्यात आलेल्या कर आकारणीची माहिती संकलीत करुन त्यानुसार प्रशासना मार्फत मा. महासभेस पुनःश्च गोषवारा सादर केला.

परंतु गोषवाराच्या अनुषंगाने मा. महासभा ठराव क्र. २१ दि. ०७/०६/१९ अन्वये शैक्षणिक संस्थाना निवासी दराने कर आकारणी करणे बाबत ठराव पारीत झाला. मंजुर ठरावात प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्या व्यतिरीक्त खालील बाबींचा समावेश करण्यांत आलेला आहे.

**महानगरपालिका हद्दीतील सर्व शैक्षणिक संस्थांना त्यावेळेस अस्तित्वात असलेल्या प्रचलित निवासी दराने कर आकारणी करणे बाबत तसेच शैक्षणिक संस्थेची स्वतंत्र इमारत असावी, शैक्षणिक संस्थेची नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली केलेली असावी, सवलत दिलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थी प्रवेशासाठी महानगरपालिकेचा १०% कोटा बंधनकारक राहील. उपरोक्त बाबींची पुर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता कराच्या सामान्य करात ५०% सवलत देणे बाबत निर्णय पारीत झालेला आहे.**

तसेच ज्या शैक्षणिक संस्थेस बिगर निवासी दराने अथवा विना सवलतीने कर आकारणी केलेली आहे. अशा शैक्षणिक संस्थानी वरील बाबींची पुर्तता केल्यास अशा शैक्षणिक संस्थाना जास्तीत जास्त ६ वर्षे मागे जाऊन सवलत देण्यांत यावी. व जादा भरणा केलेल्या रक्कमेचे पुढील आर्थिक वर्षात समायोजन करण्यांत यावे. असा ठराव पारीत करण्यांत आला आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ९५ शैक्षणिक संस्थांची कर आकारणी बाबतची माहिती खालील प्रमाणे

| अ. क्र. | कर आकारणी प्रकार | सुट न देण्यात आलेल्या शैक्षणिक संस्थेंची संख्या | सामन्य करामध्ये ५०% सुट देण्यात आलेल्या शैक्षणिक संस्थेंची संख्या | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | निवासी | ६४ | ९ | ७३ |
| २. | बिगर निवासी | २० | २ | २२ |
| एकुण | | ८४ | ११ | ९५ |

९५ पैकी सुट देण्यात आलेल्या ११ शैक्षणिक संस्थांना मालमत्ता कराच्या फक्त सामान्य करामध्ये ५०% सुट देण्यात आलेली आहे.

तथापी महालेखापाल यांनी लेखा आक्षेप नोंदवितांना शैक्षणिक संस्थांना निवासी स्वरुपाची कर आकारणी व देण्यात आलेल्या सवलतीबाबत घेतलेल्या आक्षेपानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९९, १२७, १३२, १३३अ अन्वये सुट देण्याबाबतची कायद्यात तरतुद नाही. मात्र कलम ९९ नुसार स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन कराचे दर ठरविण्याचे अधिकार मा. महासभेस आहेत. अधिनियमात तरतुद नसताना देण्यांत आलेली सवलत सुसंगत नव्हती त्यामुळे या पुर्वी ज्या शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तांना देण्यांत आलेली सुट/सवलत रद्द करुन सरसकट बिगर निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यांत यावी असे या विभागाचे मत आहे व त्यानुसार मा.महासभा ठराव क्र. २१ दि. ०७/०६/२०१९ अन्वये पारीत केलेल्या ठरावात बद्दल करण्या करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची प्रकरण २ मधील नियम १(र) नुसार धोरण व शैक्षणिक संस्थांचे दर निश्चित होणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि. 20/9/19 12:00
~~मा. स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 45 वर्ष 2019/20

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
19/9/19

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मिळकत विभाग
## मा. महासभा दि.२० / १२ /2019
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (७८)** :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता भाडे दराने न देता फक्त दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेच्या अनुषंगाने सदर जागा मिळणेबाबत खालील संस्थेचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | मालमत्तेचे नाव | अर्जदाराचे नाव / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1 | मनपा इमारती मधील व्यायाम शाळा मोर्वा, उत्तन रोड, भाईंदर (प.) | मे. आधार सहकारी पतपेढी मर्या. मोर्वा, भाईंदर (प.) |
| 2 | उत्तन व्यायाम शाळा, उत्तन, भाईंदर (प.) | उत्तन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, उत्तन भाईंदर |

मोर्वा येथील बालवाडी व्यायामशाळा इमारत ज्या जागेवर आहे ती जागा राधाकृष्ण देवस्थान ट्रस्टी व श्री. काशिनाथ गोविंद पाटील यांच्या मालकीची असून श्री. राधाकृष्ण मंदिर, मोर्वा यांनी देखिल सदर जागा देखभाल संचलनासाठी देण्याची मागणी केलेली आहे. तसेच उत्तन व्यायमशाळा इमारतीसाठी मे. मिशन लोकहित समाजिक संस्था, उत्तन यांनी दैनंदिन संचलन व देखभाल दुरूस्तीसाठी देण्याकरीता मागणी केलेली आहे. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार मागणी करणाऱ्या संस्थामधुन तीन वर्ष मुदती करीता मालमत्ता करारनामा करून देण्यास मान्यता असावी.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

1/9/15

PC-M /2019-20/S.M/M-Go -3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २० / १२/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (७८)** - <u>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत दर्शविलेले विकास योजना रस्ते सीमेंट कॉंक्रीट करुन विकसित करणेच्या मोबदल्यात विकासकास मोबदला मिळणेसाठी निर्णय होणेबाबत.</u>

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र.टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12 दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील कलम 9(IV)A नुसार रस्ता विकसीत करण्याचे समुचित प्राधिकरण मिरा भाईंदर महानगरपालिका असून **"मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. 33 परिशिष्ठ (IV)6 नुसार जागामालकाने सुविधा क्षेत्र विकसीत करून महानगरपालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण केल्यास विकसीत केलेल्या संपूर्ण क्षेत्राचा विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद आहे.** तसेच मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीप्रमाणे नागरी सुविधा क्षेत्रामध्ये रस्त्याचा समावेश असल्यामुळे तसेच मे. रवी डेव्हलपमेंट्स यांनी याप्रमाणे विकास योजना रस्त्याच्या बाजूच्या गटारासहीत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करून देण्यास तयारी दर्शविल्याप्रमाणे विकासक मे. रवी डेव्हलपमेंट्स यांना महानगरपालिकेने दि.31/01/2011 व दि.22/02/2011 अन्वये अटीशर्तीसह महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत 2,26,177.89 चौ.मी. साठी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर कार्यादेशाप्रमाणे मे. रवी डेव्हलपमेंट्स यांनी विकास योजना रस्ते विकसीत करून विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेस प्रस्ताव सादर केला असता सदर प्रकरणी महानगरपालिकेने त्यांना विकास हक्क प्रमाणपत्र दिले नसल्यामुळे मे. रवी डेव्हलपमेंट यांनी महानगरपालिकेच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.5509/2013 दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ठ केले असता, सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दि.15/04/2015 रोजी महानगरपालिकेने 4 आठवड्यात निर्णय घेणेबाबत आदेश पारित केलेले आहे.

सदर प्रकरणी मा. स्थायी समिती सभा, प्रकरण क्र. 50, ठराव क्र. 49 दि.27/07/2015 अन्वये महानगरपालिकामार्फत तडजोड करण्यास व समझोता पत्र दाखल करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 48(1)(ह) अन्वये मा. उच्च न्यायालयात दाखल करणेत येवून त्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत मा. उच्च न्यायालयात दि.29/07/2015 रोजी संमतीपत्र दाखल केलेले असून मा. उच्च न्यायालयाने दि.29/07/2015 रोजी महानगरपालिकेने दिलेल्या संमतीप्रमाणे कार्यवाही करणेस आदेशीत केलेले आहे.

विकास योजनेमधील रस्ते विकसीत करून त्यामोबदल्यात किती व कसे विकास हक्क प्रमाणपत्र द्यावे याबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतूद नसल्यामुळे व शासनाचे सन 2011 कालावधीत कोणतेही परिपत्रक / सूचना / मार्गदर्शन मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झालेले नसल्यामुळे अश्या प्रकरणांत विकसीत करणेसाठी आलेला खर्चाचा मोबदला हस्तांतरीत विकास हक्काच्या (TDR) स्वरुपात देणेकरिता TDR चा दर जमिन दराच्या तुलनेत किती विचारात घ्यावा. याकरिता सहा. संचालक, नगररचना (मुल्यांकन), कोकण विभाग यांना महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/136/2011-12, दि.15/04/2011 अन्वये मागदर्शन अपेक्षिलेले होते. याबाबत सहाय्यक संचालक, नगररचना (मुल्यांकन) विभाग यांनी पत्र क्र. ससंनर(मु.)/कोवि/ठाणे/मिरा भाईंदर मनपा संदर्भ/272, दि.23/05/2011 अन्वये TDR चा दर हा संबंधीत जमिन दरापेक्षा कमी असल्याचे व मुंबई महानगरपालिकेबाबत TDR वापर करण्यास 40% इतकी वापर क्षमता विचारात घेतली जात असल्याचे (पर्यायाने TDR चा दर हा सर्वसाधारण जमिन दराच्या 60% इतका परिगणित होत असल्याचे) कळविलेले आहे.

त्यानुसार विकासक मे. रवी डेव्हलपमेंट्स यांनी विकसीत केलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासणीसाठी भारतीय प्रायोगिक संस्था (IIT) मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला असून त्याप्रमाणे भारतीय प्रायोगिक संस्था (IIT) मुंबई यांनी सदर रस्ते 25 वर्षापेक्षा जास्त काळ टिकण्याची शक्यता असल्याचे दि.05/03/2015 रोजी अहवाल दिल्याप्रमाणे विकसीत केलेल्य रस्त्याच्या झालेल्या मुल्यांकनाप्रमाणे आणि सहा. संचालक नगररचना (मुल्यांकन) कोकण विभाग ठाणे यांच्याकडील पत्र क्र.ससंनर(मु.)कोवि/ठाणे/मिरा भाईंदर म.न.पा. संदर्भ/277 दि.23/05/2011 प्रमाणे विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र क्र.517 दि.28/08/2015 अन्वये विकास हक्क प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे.

त्यानंतर मंजूर विकास योजनेने बाधीत क्षेत्रासह आरक्षणाच्या विकास करण्याबाबत व नागरी सुविधा क्षेत्राच्या विकासकाबाबत विकास हक्क प्रमाणपत्र देणेबाबत शासनाने दि.29/01/2016 अन्वये अधिसूचना पारित केली. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीप्रमाणे व दि.29/01/2016 रोजीच्या शासन अधिसूचनेमधील तरतूदीप्रमाणे जागामालक त्यांच्या मालकीच्या असलेल्या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्र विकसीत करणेची तरतूद आहे. त्याप्रमाणे विकासकाच्या मालकीच्या मंजूर रेखांकनामधील रस्त्याचा विकास करू शकतात. तथापि विकासकाच्या मालकीच्या जागेलगत असलेले इतर विकासकाच्या मंजूर रेखांकनामधील रस्त्याचा विकास करण्याची तरतूद नसल्यामुळे सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्याचा अर्धवट विकास होण्याची शक्यता घेऊन तसेच फक्त मालकीच्या जागेतील रस्त्याचा विकास विचारात घेतल्यास तुकड्या-तुकड्यामध्ये रस्त्यांचा विकास होवून रस्त्याची मजबूती व एकसलगता उपलब्ध होणार नाही. तसेच त्यामुळे सदर सिमेंट कॉक्रीट रस्त्याच्या नागरीकांना पूर्णत: फायदा मिळू शकणार नसल्यामुळे यासर्व बाबींचा विचार करता विकासकाकडून विकास योजना रस्त्याचा विकास तुकड्या तुकड्यामध्ये करून न घेता एक सलग रस्त्याचा विकास करून घेणेबाबत व रस्त्याचा विकास पूर्ण झालेनंतर विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे. याप्रमाणे तत्कालीन आयुक्त यांन जा.क्र.मनपा/आयुक्त/381/2015-16 दि.28/03/2016 अन्वये आदेशित केलेले आहे.

शासन अधिसूचनेमधील तरतुदीप्रमाणे सदर विकासकाने विकसीत केलेल्या रस्त्याच्या मोबदल्यामध्ये वेळोवेळी विकासकास भारतीय प्रायोगिक संस्था (IIT) मुंबई यांचेकडील अहवाल घेऊन विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 530, 537, 538, 543 अन्वये विकास हक्क प्रमाणपत्र निर्गमित केलेले असून विकास योजना रस्ते जनतेसाठी खुले केलेले आहेत. तद्नंतर मा. शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 154 अन्वये दि.23/04/2018 रोजी विकास योजना रस्ता विकसीत केल्यानंतर विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र वितरीत करणेबाबतचे नव्याने निर्देश दिलेले असून त्यामध्ये त्यानी विकास योजना रस्ते विकासकास विकासहक्क प्रमाणपत्र देतेवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जिल्हादर सुची प्रमाणे (DSR) नुसार दराचा आधार घेवून रस्त्याचे बांधकाम वैशिष्ट्यानुसार रस्ता विकसनाचा खर्च निश्चित करून एकूण बांधकामाची किंमत संबंधीत नियोजन प्राधिकरणाचे आयुक्त यांनी निश्चित करून पुढील कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत.

याबाबत विकासकाने विकसीत केलेल्या विकास योजना रस्त्याचे विकास हक्क प्रमाणपत्र मा. शासनाने दि.29/01/2016 रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे विकासकास विकासहक्क प्रमाणपत्र वितरीत केलेले आहे. उर्वरीत क्षेत्राचे विकास हक्क प्रमाणपत्र विकासकास मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असता विकासकास दि.23/04/2018 अन्वेच्या मा. शासनाच्या निर्देशानुसार जिल्हादर सुचीप्रमाणे (DSR) आकडेमोड करून विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र दिलेले आहे.

तथापि विकासकाने दि.09/08/2018 अन्वये मा. शासनाने दिलेले दि.23/04/2018 अन्वयेचे धोरण मला लागु होत नसून मला महानगरपालिकेने 2011 रोजी कार्यादेश दिलेले असून त्याप्रमाणे मी रस्ता विकसीत करत असून त्याप्रमाणे मी रस्ता विकसीत करण्याचे काम करत आहे. तरी मा. शासनाने दि.29/01/2016 च्या परिपत्रानुसार विकास हक्क प्रमाणपत्र देणेबाबत विनंती केलेली आहे.

मिरा भाईंदर शहर ठाणे व बृहन्मुंबई शहरालगत असल्यामुळे मागिल 15 वर्षापासून शहराचा मोठया प्रमाणात विकास झालेला असून शहरातील जमिनीचे दर हे जमिनीच्या बाजार मुल्याच्या तुलनेमध्ये जास्त प्रमाणात शिध्दशिघ्र गणकामध्ये गृहित धरलेले आहेत. जमिनीच्या वाढलेल्या दराचा विचार करता दि.23/04/2018 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे विकासकास विकसित केलेल्या रस्त्याच्या बांधकामापोटी झालेल्या खर्चापेक्षा टीडीआर स्वरुपात फारच कमी प्रमाणात मोबदला मिळत आहे. यास्तव विकासकांनी विकसीत केलेल्या कामासाठी रोख स्वरुपामध्ये मोबदल्याची मागणी केल्यास त्याप्रमाणेची रक्कम विकासकास देणे महानगरपालिकेस शक्य होणार नाही.

सबब महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना मुलभूत सोईसुविधा उपलब्ध होणेच्या दृष्टीकोनातून रस्ते विकसीत केलेनंतर मा. सहा. संचालक, नगररचना (मुल्यांकन), कोकण भवन यांचे अभिप्रायाप्रमाणे जमिनीच्या दराच्या 60% प्रमाणेचे दर गृहित धरुन विकासकास विकास हक्क प्रमाणपत्रान्वये मोबदला देणे बाबत मा. शासनास पत्र क्र.मनपा/नर/4638/2018-19 दि.30/10/2018 अन्वये शासन स्तरावरती धोरणात्मक निर्णय घेणेबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. याबाबत मा.राज्य मंत्री, (नगरविकास) यांचे दालनात दि.01/3/2019 रोजी सकाळी 11.00 वाजता बैठक पार पडलेली आहे. प्रकरणात शासनाने जा.क्र. टिपीएस-1219/714/प्र.क्र.45/19/नवि-12, नगरविकास विभाग, चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई 32, दि.30/07/2019 अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील विविध विकासकांच्या मालकीच्या, महानगरपालिका हस्तांतरीत झालेल्या / होणा-या क्षेत्रावर जाहीर निविदा मागवून टि.डी.आर. च्या स्वरुपात रस्ते विकसीत करण्यासंदर्भात आपणास यापुर्वीच संदर्भित दि.23/03/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानंतर विकासक मे. रवी डेव्हलपमेंट्स यांनी दि.28/02/2019 रोजी सदर बाबतीत मा. राज्यमंत्री, नगरविकास यांचेकडे सादर केलेल्या निवेदनावर दि.01/03/2019 रोजी मा. राज्यमंत्री महोदयांनी सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत विकासकाने व महानगरपालिकेने सादर केलेल्या कागदपत्रांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे आपणास कळविण्याचे मला आदेश आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. 5509/2013 मधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन पुढील कार्यवाही करणे क्रमप्राप्त होते. याबाबत आपणास यापुर्वीही दि.23/03/2018 रोजीच्या पत्रान्वये शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी विकासकास टि.डी.आर. देण्यासंदर्भात मिरा भाईंदर शहरातील रस्ते विकसीत करण्याची आवश्यकता व त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने केलेली कार्यवाही, विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी, टि.डी.आर. संदर्भातील शासन नगर विकास विभागाचा निर्णय व मा. उच्च न्यायालयाचे आदेश इत्यादी विचारात घेऊन प्रकरणी महानगरपालिकेने गुणवत्तेवर निर्णय घेण्यात यावा".

उपरोक्त बाब विचारात घेता मा. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत दर्शविलेले विकास योजना रस्ते सीमेंट कॉंक्रीट करुन विकसित करणेच्या मोबदल्यात विकासकास मोबदला मिळणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी प्रकरण सादर.

13/8/19

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

महाराष्ट्र शासन

क्रमांक.-टिपीएस- १२१९/७१४/प्र.क्र.४५/१९/नवि-१२
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ३० जुलै, २०१९.

प्रति,

आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (पश्चिम).

**विषय** :- मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील विविध विकासकांच्या मालकीच्या, महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेल्या/होणा-या जागेसाठी जाहीर निविदा मागवून टिडीआरच्या स्वरुपात रस्ते विकसित करणेबाबत...

**संदर्भ** :- शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र.टिपीएस-१२१६/१८५६/प्र.क्र.४/१७/नवि-१२ दि.२३ मार्च, २०१८.

महोदय,

कृपया संदर्भित पत्राचे अवलोकन होणेस विनंती आहे. मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील विविध विकासकांच्या मालकीच्या, महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेल्या/होणा-या क्षेत्रावर जाहीर निविदा मागवून टिडीआरच्या स्वरुपात रस्ते विकसित करण्यासंदर्भात आपणास यापुर्वीच संदर्भित दि.२३/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानंतर विकासक मे.रवि डेव्हलपर्स यांनी दि.२८/२/२०१९ रोजी सदर बाबतीत मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचेकडे सादर केलेल्या निवेदनावर दि.१/३/२०१९ रोजी मा.राज्यमंत्री महोदयांनी सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत विकासकाने व महानगरपालिकेने सादर केलेल्या कागदपत्रांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आपणास कळविण्याचे मला आदेश आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.५५०१/२०१३ मधील मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन पुढील कार्यवाही करणे क्रमप्राप्त होते. याबाबत आपणास यापुर्वीही दि.२३/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी विकासकास टिडीआर देण्यासंदर्भात मिरा-भाईंदर शहरातील रस्ते विकसित करण्याची आवश्यकता व त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केलेली कार्यवाही, विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी, टिडीआर संदर्भातील शासन नगर विकास विभागाचा निर्णय व मा.उच्च न्यायालयाचे आदेश इत्यादी विचारात घेऊन प्रकरणी महानगरपालिकेने गुणवत्तेवर निर्णय घेण्यात यावा.

आपला,

(अशोक का. खांडेकर)
कार्यासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २० /१२ /२०१९

## // पुरवणी गोषवारा //

**प्रकरण क्र. ५७ :-** **मा. स्थायी समितीच्या दोन (२) सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २३ अन्वये उर्वरीत कालावधीसाठी दोन (२) सदस्यांची नेमणूक करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०१९ च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत असल्याने दि. २०/१२/२०१९ रोजीच्या महासभेमध्ये प्रकरण क्र. ५७ अन्वये निवृत्त होणाऱ्या निम्मे (आठ) सदस्यांच्या जागी नवीन आठ सदस्यांची नेमणूक करणेकरिता प्रस्ताव विषयपटलावर घेण्यात आलेला आहे.

दि. १२/१२/२०१९ रोजी शिवसेना पक्षाच्या पुढील दोन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

१) श्रीम. वंदना विकास पाटील - शिवसेना

२) श्रीम. दिप्ती शेखर भट - शिवसेना

वरील दोन सदस्यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ अन्वये राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी उर्वरीत कालावधीकरिता नविन दोन सदस्यांची नेमणूक होणेसाठी महासभेपूढे पुरवणी गोषवारा प्रस्तावित करण्यात येत आहे.

17/12/19

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय
दि. 17/12/2019

## मा. महासभा दि. 20/12/2019

## पुरक घोषणा

प्रति,
सन्मा. श्री./श्रीम. ------------------------------------------
नगरसेवक/नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण 2 नियम 1 (ज) अन्वये दिनांक 20/12/2019 रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र. क्र. | विषय |
|---|---|
| 80 | सन्मा. सदस्य श्री. जुबेर अ. इनामदार यांचा दिनांक 16/12/2019 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---------------------------------------------<br>मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. 178 मैदान येथील समाजमंदिर इमारतीस माजी सरपंच तथा भाईंदर शेतकरी शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष कै. श्री. कृष्णराव गोविंदराव म्हात्रे ह्यांचे नाव देणेबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# जुबेर अ. इनामदार
नगरसेवक/गटनेता - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रती** १६-१२-२०१९
**मुख्य सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**जिल्हा ठाणे**

विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका मा महासभा दि २०-१२-२०१९ महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम परिशिस्त 2 ( ज ) अन्वये प्रस्ताव.

महोदय

दि १५ दिसेंबर २०१९ रोजी मिरा भाईंदर मिरा भाईंदर शराचे समाजसेवक माजी सरपंच तथा भाईंदर शेतकरी शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष कै श्री कृष्णराव गोविंदराव म्हात्रे यांचा वयाचा १०२ वर्षा दुखत निंधन झाले. यांना श्द्धांजली निमिताने महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग क्रं ९ अंतर्गत आरक्षण क्रं १७८ मैदान या मध्ये समाज केंद्र उभारण्यात आले आहे तरी सदर संपूर्ण इमारतीला या शहराचे माजी सरपंच तथा भाईंदर शेतकरी शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष कै श्री कृष्णराव गोविंदराव म्हात्रे हे नाव देण्यास अधरांजलीचा प्रस्ताव सादर

सुचक

आपला विशवसु

जुबेर ईनामदार
गटनेता काँग्रेस/लोकशाही आघाडी

अनुमोदक

निवास : १०१, मिरा स्मुती अपार्ट., नयानगर, मिरा रोड (पूर्व), ता.जि. ठाणे - ४०१ १०७.
मुख्य कार्यालय : मध्यवर्ती काँग्रस कार्यालय, नयानगर, मिरा रोड (पूर्व), ता.जि. ठाणे - ४०१ १०७.
भ्रमणध्वनी : 98203 18999 Email ID : inamdarzub@yahoo.com

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०१ १०१

**नगरसचिव विभाग**

जा.क्र.मनपा/सचिव/९३४/२०१९-२० दिनांक :-२९/०१/२०२०

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा शुक्रवार दि. २०/१२/२०१९ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा ठरावाद्वारे तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. ५६ ते ७९ व पुरक घोषणा क्र. ८० तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम "अनुसूची ड" प्रकरण २ कलम "के" अन्वये सभागृहात प्राप्त झालेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी ही सभा शुक्रवार, दिनांक ३१/०१/२०२० रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

मा. महापौर, यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका